अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!

वरुड | शुक्रवार
२८.०८.२०२६

# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २०१ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## प्रज्ञानानंदने रचला इतिहास

### ग्रँड चेस टूर फायनल जिंकणारा पहिला भारतीय ठरला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**सेंट लुईस** – भारतीय बुद्धिबळपटू आणि ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानानंदाने फॅबियानो करूआनाचा पराभव करत इतिहास रचला आहे. सेंट लुईसमध्ये झालेल्या Grand Chess Tour Finals च्या अंतिम सामन्यात प्रज्ञानानंदाने १५-१३ असा विजय मिळवत विजेतेपद पटकावलं.

या विजयासह तो Grand Chess Tour Finals जिंकणारा पहिला भारतीय ठरला आहे. अंतिम सामन्याच्या शेवटच्या दिवशी प्रज्ञानानंदासमोर मोठं आव्हान होतं. तो तब्बल सहा गुणांनी पिछाडीवर होता. पहिल्या क्लासिकल गेममध्ये करूआनाने ६-० अशी आघाडी घेतली, तर दुसरा क्लासिकल सामना ३-३ असा बरोबरीत राहिला. मात्र, प्रज्ञानानंदाने हार न मानता जबरदस्त पुनरागमन केलं. त्याने दोन्ही रॅपिड गेम जिंकत सामन्यात जोरदार कमबॅक केलं. त्यानंतर ब्लिट्झ गेम्समध्येही त्याने आवश्यक नियंत्रण राखलं आणि अखेर एकूण १५-१३ असा विजय मिळवत ट्रॉफीवर नाव कोरलं. या ऐतिहासिक विजेतेपदासाठी प्रज्ञानानंदाला तब्बल २ लाख अमेरिकन डॉलरचं बक्षीस मिळालं आहे. भारतीय बुद्धिबळासाठीही हा मोठा क्षण मानला जात आहे. विजयानंतर प्रज्ञानानंदाने या स्पर्धेचं महत्त्व अधोरेखित केलं. जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेनंतर Grand Chess Tour ही जगातील सर्वात प्रतिष्ठित स्पर्धांपैकी एक असल्याचं त्याने म्हटलं. या स्पर्धेचं विजेतेपद मिळवणं आपल्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब असल्याचंही त्याने सांगितलं. विशेष म्हणजे, प्रज्ञानानंदाने प्रतिकूल परिस्थितीतून केलेलं हे पुनरागमन त्याच्या मानसिक ताकदीचं आणि दबावाखाली खेळण्याच्या क्षमतेचं उत्तम उदाहरण ठरलं आहे. भारतीय बुद्धिबळाच्या इतिहासात प्रज्ञानानंदाच्या या विजयाची नोंद आता एका ऐतिहासिक अध्यायाप्रमाणे झाली आहे.

### चिरडलेल्या जीवांचा शोध सुरु असतानाच नेपाळ-तिबेट सीमेजवळील आणखी १ तलाव फुटला

## भोटेकोशी, त्रिशुली, नारायणी नद्यांजवळील अनेक गावे रिकामी केली, आतापर्यंत ४७८ जणांचा मृत्यू, १५०० जण बेपत्ता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**तिबेट** – नेपाळ-तिबेट सीमेजवळील आणखी एक तलाव फुटला आहे. चोचेन नदी आणि पुरेपु त्सांगपो नदीच्या संगमाजवळ तयार झालेला हा तलाव आहे. एक दिवसापूर्वीच चीनने तो फुटण्याबद्दल चिंता व्यक्त केली होती. तलाव फुटल्यानंतर पाण्याची पातळी वाढू लागली आहे. धोक्यामुळे रसुवा जिल्ह्यातील बचावकार्य ९० मिनिटांसाठी स्थगित करण्यात आले आहे. भोटेकोशी, त्रिशुली आणि नारायणी नद्यांजवळील अनेक गावे रिकामी केली जात आहेत. रहिवासी आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांना तात्काळ सुरक्षित ठिकाणी जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. दरम्यान, चीनने दुसऱ्या पुराच्या धोक्याचा हवाला देत तिबेटमधील मदत आणि बचाव कार्य स्थगित केले असून लेव्हल ४ चा इशारा जारी केला आहे. दोन्ही देशांमध्ये पूर आणि भूस्खलनामुळे आतापर्यंत ४७८ लोकांचा बळी गेला आहे, तर सुमारे २९० भारतीयांसह १,५०० हून अधिक लोक बेपत्ता आहेत.

नेपाळमध्ये मोठी जिवितहानी नेपाळमध्ये आतापर्यंत ४७५ लोकांच्या मृत्यूची पुष्टी झाली आहे. ९७७ लोक अजूनही बेपत्ता आहेत. बेपत्ता झालेल्यांमध्ये ५१७ परदेशी नागरिक, नेपाळी लष्कराचे ४५ जवान आणि नेपाळी पोलिसांचे ४१ जवान यांचा समावेश आहे. तिबेटमध्ये तीन जणांच्या मृत्यूची पुष्टी झाली आहे. ५५८ लोक अजूनही बेपत्ता आहेत. बेपत्ता झालेल्यांमध्ये २६० परदेशी नागरिकांचा समावेश आहे.

बचाव कार्यात मोठी आव्हाने पूरानंतर नेपाळमधील परिस्थिती गंभीर आहे. प्रतिनिधी सभेतील विरोधी पक्षनेते भीष्म राज आंगदेम्बे म्हणाले की, दुर्गम प्रदेश आणि खराब हवामानामुळे मदत आणि बचाव कार्यात मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यांनी एएनआयला सांगितले की, या अडचणी असूनही, लष्कराची आणि हेलिकॉप्टरची सर्व पथके बचाव कार्यात गुंतलेली आहेत.

### थोडक्यात

## पालिका शाळांमध्ये निकृष्ट मध्यान्ह भोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे मध्यान्ह भोजन देण्यात येते, असा गंभीर आरोप उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचे नगरसेवक अंकित सायली सुनील प्रभू यांनी केला आहे. निकृष्ट दर्जाच्या मध्यान्ह भोजनामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून अन्न व औषध प्रशासन विभागाने (एफडीए) तातडीने कारवाई करावी, पालिका शाळांमध्ये पुरवल्या जाणाऱ्या अन्नाचा दर्जा अत्यंत खालच्या पातळीचा असून, शिजवताना आणि पुरवताना स्वच्छतेच्या नियमांची पायमल्ली केली जात असल्याच्या अनेक तक्रारी पालकांकडून प्राप्त झाल्या आहेत.

### मित्रांसोबत बारमध्ये असताना पत्नीचा फोन आला

## बाहेर निघताच अक्षयच्या डोळ्यात तिखट फेकलं अन सात जणांनी मिळून जागीच...

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नागपूर** – नागपुरात पुन्हा एकदा गुंडगिरीने डोकं वर काढलंय का? असा प्रश्न नागपूरकरांना पडला आहे. कारण नागपूर पुन्हा एकदा हत्येच्या घटनेनं हादरलं आहे. नागपुरातील नंदनवन परिसरात गुंड अक्षय वंजारी याची हत्या करण्यात आली. मंगळवारी सायंकाळी सोमरस बारबाहेर ही घटना घडलीय. तर दुसरीकडे नागपुरातील कळमना पोलीस ठाण्याच्या हद्दीत दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने मोठ्या भावाने घरात गोंधळ घातला. यानंतर संतापलेल्या लहान भावाने मोठ्या भावावर चाकूने वार केलं असून यात गंभीर जखमी झालेल्या २१ वर्षीय तरुणाचा मेयो रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या दोन्ही घटनेनं नागपूर पुन्हा एकदा हादरलं असून गुन्हेगारांच्या मुसक्या आवळणे आता पोलिसांपुढचं आव्हान असणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी सोमरस बारमध्ये अक्षय मित्रांसोबत बसला होता. पत्नीचा फोन आल्याने तो खाली आला. त्यावेळी एकाने अक्षयच्या डोळ्यात तिखट फेकले. त्यानंतर प्रदीप आखरे, प्रशांत आखरे, सूरज लांजेवार आणि इतरांनी त्याच्यावर लोखंडी शस्त्र आणि चाकूने हल्ला केला. अक्षयला वाचवण्यासाठी आलेल्या अश्विन रहांगडाले याच्यावरही हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर हल्लेखोरांनी घटनास्थळावरून पळ काढला. दरम्यान गंभीर जखमी अक्षयला अश्विनने रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान बुधवारी त्याचा मृत्यू झाला.

पोलिसांचा प्राथमिक अंदाज, पोलिसांचा खबरी असल्याच्या संशयातून हत्या दरम्यान, अक्षय पोलिसांचा खबरी असल्याच्या संशयातून हत्या झाल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. सूरज लांजेवारच्या भावाच्या चोरीच्या प्रकरणातील अटकेमागे अक्षयचा हात असल्याचा संशय होता.

## लग्नाची वरात घेऊन जाणारी खासगी बस थेट डांबाला धडकून पलटी, ३५ जखमी : पण दैव बलवत्तर म्हणून दुसरा वाचलेला स्कुटीवाला मात्र जागेवरच 'ठंडा ठंडा कूल कूल..'

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**कुथट्टुकुल** – केरळमधील कुथट्टुकुलम जवळ कक्कूरला एका लग्नसमारंभासाठी वऱ्हाडींना घेऊन जाणारी बस उलटली. ज्यामध्ये ३५ जण जखमी झाले असून, त्यापैकी चार जण गंभीर जखमी आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात झाला तेव्हा बस कलाडीहून एलांजीकडे जात होती. हा संपूर्ण थरार सीसीटीव्हीत कैद झाला असून एका स्कुटीवाल्याला वाचवण्याच्या नादात बस थेट पेट्रोल पंपावरील खांबावर जाऊन आदळली. मात्र, यावेळी पेट्रोलपंपसमोर असलेला स्कुटीवाला अवघ्या इंचभराच्या अंतरावर बस पलटी होऊन जागेवरच 'ठंडा ठंडा कूल कूल..' असल्याचे दिसते. त्यामुळे इतका गंभीर अपघात होऊन त्या स्कुटीवाल्याच्या निवांतपणामुळे अनेकांनी सोशल मीडियात जोक केले आहेत. काहींनी यमराज रक्षाबंधनासाठी सुट्टीवर होते, म्हणून अशी प्रतिक्रिया दिली आहे. स्कुटीवाल्याला चकवण्याच्या नादात नियंत्रण सुटले मिळालेल्या माहितीनुसार, खासगी बस स्कुटीवाल्याला चकवण्याच्या नादात बस चालकाचे नियंत्रण सुटले.

त्यानंतर बस उलटली आणि परिसरातील एका पेट्रोल पंपावर जाऊन आदळली. जखमी झालेल्या चार प्रवाशांना उपचारासाठी कुथट्टुकुलम येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. गंभीर जखमी झालेल्यांची माहिती तत्काळ कळू शकली नाही. अपघातानंतर जखमी झालेल्या इतर प्रवाशांनाही वैद्यकीय मदत देण्यात आली.

## बाभुळखेड्यात युवकाची शेतात गळफास घेऊन आत्महत्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

### आंब्याच्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला



**वरुड** – तालुक्यातील आमनेर जवळील बाभुळखेडा येथे २४ वर्षीय युवकाचा शेतात मृतदेह आढळून आल्याची घटना बुधवारी २६ ऑगस्ट सकाळी उघडकीस आली.

हर्षल जिचकार वय २४ असे मृत युवकाचे नाव असून, वरूड पोलिसांनी या प्रकरणी दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, हर्षल मंगळवारी घराबाहेर गेला होता. त्यानंतर तो घरी परतला नव्हता बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजता त्याचे काका नारायण जिचकार शेतात गेले असता, मौजा बाभुळखेडा येथील रत्नाकर रेवतकर यांच्या सर्वे क्रमांक १८७ मधील शेतात हर्षलचा मृतदेह आढळला.

घटनेची माहिती मिळताच गावातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. यानंतर वरूड पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविला.

मृत्यूचे नेमके कारण वृत्त लिहिताना स्पष्ट झाले नव्हते. वरूड पोलिसांनी दाखल करून घटनेचा पुढील तपास सुरू केला आहे.




# शासन व्यवहारासाठी राज्य सहकारी बँकेची निवड

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., ही राज्यातील ५७४६ कोटी मूल्य असणारी बँक आहे. शासन व्यवहारासाठी २०२६-२७ सालासाठी राज्य सहकारी बँकेची निवड सरकारने केली आहे. हा बहुमान मिळवणारी राज्य सहकारी बँक ही एकमेव सहकारी बँक आहे, असे बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितले.

२० ऑगस्ट रोजी राज्य शासनाने जाहीर केलेल्या महत्त्वपूर्ण शासन निर्णयाप्रमाणे




२०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी शासकीय कार्यालयांचे बँकिंगविषयक तसेच सार्वजनिक उपक्रम व महामंडळाकडील अतिरिक्त निधी गुंतवणुकीसाठी या बँकांना पात्रता धारण करणाऱ्या बँका म्हणून घोषीत केले. यात अनुसूचित वाणिज्य बँकांच्या यादीमध्ये इतर अकरा बँका आहेत.

सहकारी बँकांच्या यादीमध्ये राज्य सहकारी बँकेचे नाव आहे. अन्य कोणत्याही सहकारी बँकांना ही पात्रता धारण करता आलेली नाही. यात राष्ट्रीय बँकेसह व्यापारी बँकांमध्ये राज्य सहकारी बँकेस मिळालेले स्थान अभिमानास्पद आहे.

शासनाने आकारमान, भांडवली पर्याप्तता आणि नियामक निकषाचे पालन करणाऱ्या बँकांचाच या यादीत समावेश केला आहे.

# मुंबईचा पुढील महापौर शिवसेनेचा : एकनाथ शिंदेंची घोषणा, भाजपमध्ये चलबिचल

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – मुंबईचा प्रथम नागरिक म्हणून पुढील महापौर शिवसेनेचा असेल अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर या विषयी आधीच चर्चा झाल्याचे सांगत शिंदे यांनी महापौर रितू तावडे यांचा अडीच वर्षांचा कार्यकाळ संपल्यानंतर पुढील सव्वा वर्षे शिवसेनेचा महापौर असेल, असा दावा केला. एकनाथ शिंदे यांच्या या



वक्तव्यामुळे मुंबई महापालिकेतील मोठ्या भावाच्या भूमिकेत असलेला भाजप काय भूमिका मांडणार याकडे सगळ्याच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नंदनवन निवासस्थानी अनौपचारिक बैठकीत पत्रकारांशी ते बोलत होते. यावेळी एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील विविध प्रश्नांवर भाष्य केले. मुंबई महापालिकेत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या पाठिंब्यामुळे भाजपला मुंबई महापालिकेतील सत्ता स्थापन करणे शक्य झाले. त्यानुसार अडीच वर्षांसाठी भाजपने महापौरपदाची माळ रितू तावडे यांच्या गळ्यात घातली.

रितू तावडे या अडीच वर्षांसाठी महापौरपदी असणार आहेत. मात्र त्यानंतर पुढील सव्वा वर्षे महापौर शिवसेनेचा असेल, असा दावा एकनाथ शिंदे यांनी केला आहे. रस्त्यांच्या कामांमुळे शहरातील खड्ड्यांची समस्या मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचा दावा केला.

आमदार यावलकर यांच्या पुढाकराने आयोजीत

# दिव्यांग प्रमाणपत्र शिबिरात १ हजार ५१४ नागरिकांचा सहभाग

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरूड** – भारतीय जनता पार्टी आणि जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आज दुपारी आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या पुढाकाराने भव्य दिव्यांग प्रमाणपत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराला दिव्यांग नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असुन तब्बल १ हजार ५१४ नागरिकांनी सहभाग नोंदविला. शिबिरामध्ये अस्थिव्यंग, मतिमंदत्व, पक्षाघात, नेत्रविकार, कान-नाक-घसा तसेच इतर विविध प्रकारच्या दिव्यांगत्वाची



तपासणी करण्यात आली. दिव्यांगत्वाशी संबंधित २१ आजारांचीही तपासणी करण्यात आली. शिबिरात सहभागी झालेल्या १ हजार ५१४ नागरिकांपैकी १ हजार नागरिकांकडे यापूर्वीच युआयडी प्रमाणपत्र असल्याचे आढळून आले तर ५१४ नवीन लाभार्थ्यांची युआयडी



प्रमाणपत्रासाठी नोंदणी करण्यात आली असुन त्यांची आवश्यक वैद्यकीय तपासणीही करण्यात आली.

सर्व दिव्यांग व्यक्तींची तपासणी प्रमुख डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना करणार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचे प्रतिपादन

**अमरावती** – जिल्हा स्त्री रूग्णालयात अतिदक्षता विभागात आग लागल्याची दुर्घटना घडली आहे. यात तीन नवजात बालके मृत्यूमुखी पडली.

ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. भविष्यात राज्यामध्ये अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

राज्यमंत्री बोर्डीकर यांनी यांनी आज जिल्हा स्त्री रूग्णालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी आग लागलेल्या



अतिदक्षता विभागाची पाहणी केली. आमदार प्रतापदादा अडसड, महापौर श्रीचंद तेजवानी आदी उपस्थित होते.

बोर्डीकर यांनी, जिल्हा स्त्री रूग्णालयातील आगीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी आरोग्य आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती सर्व बाबींची सखोल चौकशी करून अहवाल देणार आहे. चौकशी कोणत्याही व्यक्तीने दुर्लक्ष केल्याचे सिद्ध झाल्यास त्यांच्याविरूद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नये, यासाठी राज्यातील सर्व रूग्णालात उपाययोजना करण्यात येतील. रूग्णालायातील बालके इतर रूग्णालयात हलविण्यात आली आहेत. त्यांच्यावर दर्जेदार उपचार करण्यात येतील.

तसेच आगीच्या घटनेवेळी कर्मचाऱ्यांनी वेळेचे भान राखत बचाव केला. याबद्दल त्यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. आगीच्यावेळी गांभीर्याने घटनेचा सामना केल्याबद्दल त्यांनी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. यावेळी त्यांनी जिल्हा स्त्री रूग्णालयात तातडीने उभारण्यात आलेल्या अतिदक्षता कक्षाला भेट देऊन पाहणी केली.

# एनटीआर हायस्कूल येथे चक्रधर स्वामी जयंती उत्साहात साजरी

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरूड** – नवयुवक शिक्षण संस्था संचलित एनटीआर हायस्कूल येथे महानुभाव पंथाचे संस्थापक तथा समाजप्रबोधनकार चक्रधर स्वामी यांची जयंती उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात अया अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक योगेश बरडीया होते. यावेळी पर्यवेक्षक शशांक पाचघरे,



शिक्षक प्रतिनिधी सतीश डाखोडे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी चक्रधर स्वामी यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे व मनोगते सादर करत त्यांच्या समता, मानवता, बंधुभाव, सदाचार आणि अंधश्रद्धाविरोधी विचारांना अभिवादन केले. विद्यार्थ्यांच्या अभ्यासपुर्ण आणि प्रभावी सादरीकरणाचे उपस्थितांनी कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक योगेश बरडीया यांनी चक्रधर स्वामी यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करत, समाजातील प्रत्येक घटकाला समानतेने वागविण्याचा त्यांचा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या आचरणातून जोपासावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रभावी संचालन अमझरे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. चक्रधर स्वामी यांच्या विचारांचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.

# मीराबाई घोरपडे यांचे निधन

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – येथील जिल्हा परिषद माजी मुख्याध्यापिका मीराबाई घोरपडे यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने शैक्षणिक क्षेत्रात तसेच जरूड परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

स्वर्गीय मीराबाई घोरपडे यांनी जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापिका म्हणुन



कार्यरत असताना अनेक विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. त्यांच्या शिस्तप्रिय, प्रेमळ आणि कर्तव्यदक्ष स्वभावामुळे त्या विद्यार्थी, पालक आणि सहकाऱ्यांमध्ये आदराचे स्थान मिळवुन होत्या.

त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, नातवंडे तसेच मोठा आप्तपरिवार आहे. त्या संजय घोरपडे आणि अमर घोरपडे यांच्या मातोश्री होत्या. दुपारच्या बहादा रोड येथील स्मशानभूमी जरूड येथे पार पडला.

# खासदार अमर काळे यांचे उपस्थितीत अमडापुरात महाकाल मुर्तीची स्थापना, रक्तदान शिबिर व महाप्रसाद

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील अमडापूर येथील स्मशानभूमी परिसरात 'महाकाल' मूर्तीची भव्य प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. खासदार अमर काळे यांचे प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या धार्मिक सोहळ्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिर आयोजीत करुन रक्तदात्यांना नि:शुल्क हेल्मेटचे वितरण आणि महाप्रसादाचे सुध्दा आयोजन करण्यात आले होते.







या धार्मिक सोहळ्याची सुरुवात सकाळी ७ वाजता अमडापुर येथील हनुमान मंदिर येथून निघालेल्या शोभायात्रेने करण्यात आली. वाजत गाजत आणि भजनांच्या गजरात ही शोभायात्रा अमडापूर स्मशानभूमी परिसरात पोहचेली, या ठिकाणी महाकाल मुर्तीची शास्त्रोक्त पद्धतीने प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. धार्मिक विधींसोबतच समाजाप्रती असलेले उत्तरदायित्व ओळखुन आयोजीत रक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना नि:शुल्क हेल्मेटचे वितरण करण्यात आले. रक्तदान हे सर्वोत्तम आणि श्रेष्ठ दान मानले जाते. एका व्यक्तीने केलेले रक्तदान हे अपघातातील रुग्ण, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण किंवा रक्ताशी संबंधित आजारांनी ग्रस्त असलेल्या गरजू रुग्णांचे प्राण वाचवू शकते. आपल्या रक्ताचा एक थेंब कोणासाठी तरी नवसंजीवनी ठरु शकते, याच उद्देशाने आयोजीत केलेल्या या रक्तदान शिबिराला नागरिकांनी, विशेषतः युवक वर्गाने उत्स्फूर्तपणे सहभागी घेऊन रक्तदान केले. याप्रसंगी ९१ दात्यांनी रक्तदान करुन या सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदविला. रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेता वाहनचालकांच्या सुरक्षेसाठी आणि रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी नि:शुल्क हेल्मेटचे वितरण सुद्धा करण्यात आले. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन सुध्दा करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला ग्रा.पं.सदस्य सुचिता साबळे, प्रदीप सोनारे, दुर्वास सोनारे, जेष्ठ नागरिक पंजाबराव साबळे, लिलाधर धकीते, राजेंद्र साबळे यांचेसह गावातील मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महादेव काकडे, विश्वेश्वर साबळे, अमित साबळे, चक्रधर बोबडे, राजेंद्र खानजोड, विठठल वंजारी, सचिन तटटे, चंद्रशेखर साबळे, ईश्वर देशमुख, अमोल वंजारी, प्रदीप भोंडे, दुर्वास सोनारे, बाल्या ठाकरे, सतिश सोनारे, भाल्या बेले, किशोर सोनारे, नामदेव पाचपोहर यांनी परिश्रम घेतले. या सर्व धार्मिक व सामाजिक उपक्रमांना अमडापूर आणि परिसरातील सर्व नागरिक, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. या कार्यक्रमामध्ये भागवत सप्ताह समिती, समस्त ग्रामवासी, गुरुदेव भजनी मंडळ, गायत्री भजनी मंडळ, शारदा माता भजनी मंडळ , भगवती भजनी मंडळाच्या शैला काकडे, सुष्मा बेले, जयश्री भोंडे, रंजना साबळे, सुनिता साबळे, रमा बोबडे, छबु बोबडे, विजय साबळे, कुमूद चरपे यांचेसह युवक मित्र मंडळ अमडापूरचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने सहभागी झाले होते.

# संपादकीय

**{ चांगल्या विचारांनीच आयुष्यात चांगली माणसं जोडली जातात. }**

## नात्यांच्या विश्वासाचा पवित्र धागा

श्रावण पौर्णिमेचा दिवस म्हणजे भारतीय संस्कृतीतील प्रेम, आपुलकी आणि नात्यांची जपणूक करणारा मंगल दिवस. या दिवशी साजरा होणारा रक्षाबंधनाचा सण भाऊ-बहिणीच्या नात्याला एका पवित्र धाग्याने जोडतो. मनगटावर बांधली जाणारी राखी आकाराने छोटी असली, तरी तिच्यामागे दडलेली भावना मात्र विशाल असते. राखी म्हणजे केवळ रंगीत धागा नाही; ती प्रेमाची, विश्वासाची, काळजीची आणि आयुष्यभर एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्याची आठवण आहे. भारतीय संस्कृतीमध्ये नात्यांना नेहमीच विशेष महत्त्व दिले गेले आहे. आई-वडील, गुरु-शिष्य, मित्र-मैत्रीण, पती-पत्नी यांच्याप्रमाणेच भाऊ-बहिणीचे नातेही अत्यंत जिव्हाळ्याचे मानले जाते. बालपणीच्या छोट्या-छोट्या भांडणांपासून ते आयुष्याच्या कठीण प्रसंगांमध्ये एकमेकांना दिलेल्या आधारापर्यंत या नात्याचा प्रवास असतो. कधी बहिण भावाला चिडवते, तर कधी भाऊ बहिणीची काळजी घेतो. कधी दोघांमध्ये रुसवे-फुगवे होतात, तर कधी एखाद्या क्षणात सारे विसरून दोघेही एकमेकांच्या आनंदात सहभागी होतात. म्हणूनच रक्षाबंधन हा केवळ उत्सव नसून या सुंदर नात्याचा उत्सव आहे. आजच्या वेगवान आणि धावपळीच्या जीवनात माणूस आपल्या कामात, व्यवसायात आणि तंत्रज्ञानाच्या जगात अधिकाधिक गुंतत चालला आहे. मोबाईल, सोशल मीडिया आणि डिजिटल संवादामुळे अंतर कमी झाले असले, तरी प्रत्यक्ष भेटींचे आणि मनमोकळ्या संवादाचे क्षण कमी होत आहेत. अशा परिस्थितीत रक्षाबंधनासारखे सण आपल्याला थांबायला, आपल्या माणसांकडे पाहायला आणि नात्यांची किंमत जाणून घ्यायला शिकवतात. राखी बांधताना बहिणीच्या मनात भावाच्या सुखाची, आरोग्याची आणि यशाची इच्छा असते. भाऊही बहिणीला आयुष्यभर साथ देण्याचा मनोमन संकल्प करतो. मात्र आजच्या काळात 'रक्षण' या शब्दाचा अर्थ केवळ संकटाच्या वेळी संरक्षण करणे एवढाच मर्यादित राहता कामा नये. बहिणीच्या स्वप्नांना पाठबळ देणे, तिच्या निर्णयांचा आदर करणे, तिच्या शिक्षणासाठी आणि करिअरसाठी प्रोत्साहन देणे, तिच्या स्वाभिमानाचे रक्षण करणे आणि तिच्या सुख-दुःखात खंबीरपणे सोबत राहणे, हाच खऱ्या अर्थाने रक्षणाचा व्यापक अर्थ आहे. तितकेच महत्त्वाचे म्हणजे बहिणीनेही भावाच्या आयुष्यातील संघर्ष समजून घेणे, त्याच्या यशात आनंद मानणे आणि अडचणीच्या काळात त्याला मानसिक आधार देणे. कारण नाते हे एका व्यक्तीच्या जबाबदारीवर टिकत नाही. प्रेम, विश्वास, समजूतदारपणा आणि परस्पर आदर यामुळेच नाते अधिक मजबूत होते. रक्षाबंधनाच्या परंपरेला इतिहास आणि पौराणिक कथांचीही समृद्ध पार्श्वभूमी आहे. काळ बदलला, परिस्थिती बदलली, जीवनशैली बदलली; पण या सणामागील भावनिक मूल्य आजही कायम आहे. पूर्वीच्या काळात राखीला संरक्षणाचे प्रतीक मानले जात असे. आज मात्र तिचा अर्थ आणखी व्यापक झाला आहे. संकट कोणतेही असो, परिस्थिती कितीही कठीण असो, 'मी तुझ्यासोबत आहे' हा विश्वास देणारा धागा म्हणजे राखी. या सणाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे कुटुंबाला एकत्र आणण्याची ताकद. शहरांमध्ये किंवा परदेशात नोकरी-व्यवसायासाठी गेलेली भावंडे वर्षभर भेटू शकत नसतील, तरी रक्षाबंधनाच्या निमित्ताने अनेक जण आपल्या घरी परततात. एखादी बहीण लांबचा प्रवास करून भावाच्या घरी येते, प्रेमाने राखी बांधते आणि जुन्या आठवणींना उजाळा देते.



# रक्षाबंधन

## विशेषांक

|| प्रेम, विश्वास आणि संरक्षणाच्या पवित्र नातीचा उत्सव ||



### संपादकीय...

**रक्षाबंधन : नात्याचा विश्वास, संरक्षणाचा संकल्प**

रक्षावंधन हा केवळ एक सण नसून, तो भाव-बहिणीच्या नात्यातील प्रेम, आपुलकी आणि विश्वासचा प्रतीक आहे. बहिणीच्या राखीच्या एका धाग्यात असतो भाववरचा निर्स्वार्थ प्रेम, सुख-समृद्धीचा आशीर्वाद आणि भावाच्या मनात असलेले बहिणीच्या संरक्षण व सन्मानांचे वचन.

हा सण आपल्याला नात्यातील गोडवा वाढवण्यासाठी, एकमेकांना समजून घेण्यासाठी आणि आयुष्यभर साथ देण्याची प्रेरणा देतो.

चला तर, या रक्षावंधनाला आपुलकीची राखी बांधूया आणि नात्याच्या या पवित्र धाग्याला अधिक दूढ करूया.

**– संपादक**

## रक्षाबंधन : प्रेम, विश्वास आणि संरक्षणाचा पवित्र धागा



रक्षाबंधन हा हिंदू धर्मातील एक महत्वाचा सण आहे. श्रावण पौर्णिमेला साजरा केला जाणारा हा सण भाव-बहिणीच्या नात्यातील प्रेम, विश्वास आणि संरक्षणाच्या वचनाचे प्रतीक आहे. या दिवशी बहिणी भाऊच्या मनगटावर राखी बांधतात आणि भावाकडून तिच्या सुख-समृद्धीची, संरक्षणाची व आयुष्यभर साथ देण्याची प्रतिज्ञा घेतात.

### रक्षाबंधनाचे ऐतिहासिक महत्व

भारतीय इहिहासात रक्षाबंधनाचा अनेक वेळा उल्लेख आढळतो. राणी कर्णावतीने मुघल बादशहा हुमायूँला राखी पाठवून संरक्षणाची विनंती केली होती, तर कृष्णांने द्रौपदीच्या राखीसाठी तिची लाज राखली होती. या कथा या सणाचे महत्व अधिक अधोरेखित करतात.

> "राखीचा धागा छोटासा असतो, पण त्यात असते प्रेमाचा महासागर, विश्वासाची खोली आणि संरक्षणाचा दूढ संकल्प."

### आजचे सुविचार

"नातं हे रक्ताचं असावं लागत नाही, नातं हे मनाचं असतं. राखीचा धागा हा त्याच मनाच्या नात्याचा पुरावा आहे."

### रक्षाबंधनाची माहिती

- सण : श्रावण पौर्णिमा
- तिथि : श्रावण पौर्णिमा
- महत्व : भाव-बहिणीच्या नात्याचा सन्मान व संरक्षण
- प्रतीक : प्रेम, विश्वास, संरक्षण
- प्रारंभ : प्राचीन काळापावूननं भारतीय संस्कृतीचा भाग



## रक्षाबंधन – नुसता सण नाही, तर संस्कारांचा उत्सव

भारतीय संस्कृतीत सणांना अनन्यसाधारण महत्व आहे. आहे, रक्षावंधन हा सण भाव-बहिणींच्या नात्यातील प्रेम, विश्वास, आदर आणि समर्पण वाढो वाढणारा आहे.

हा सण आपल्याला एकमेकांच्या जबावदाऱ्या ओळखापला शिकवतो.

लहानपणी बहिणीने बांधलेली राखी आणि भावाने दिलेला गोड शब्द किंवा भेटवस्तु हा क्षण आयुष्यभर लिक्षात्त राहतो. मोठे होताना ही नाती अधिक परिपक्व आणि दूढ होत जातात.

आजच्या बदलत्या जीवनशैलीत [illegible] गोडी आणि कृतज्ञतेची [illegible] टिकवून ठेवण्यासाठी, एकमेकांची काळजी घेणे, विश्वास ठेवणे आणि अडचणीच्या वेळी [illegible] आहे.

चला तर, या रक्षावंधनाला नात्यांच्या या पवित्र धाग्याला अधिक करूया.



### राखी बांधण्याठी शुभ वेळ

श्रावण पौर्णिमा
दि. २८ ऑगस्ट 202६
शुक्रवार

सकाळी शुभ वेळ : 05:47 ते 10:24
दुपारसी शुभ वेळ : 01:24 ते 03:35
सायंकाळी शुभ वेळ : 06:05 ते 08:15

शुभ मुहूर्तावर राखी वांधा, नात्यात आनंद आणि समृद्धी वादवा.




### भाऊ-बहिणींच्या नात्याची वैशिष्ट्ये

- हे नाते निस्वार्थ आणि स्वच्छ असते.
- संकटात सदैव साथ देणारे असते.
- आयुष्यभर प्रेम आणि विश्वास टिकवणारे असते.
- भांडणे होतात, पण मनात कधी कटूता नसते.
- हे नाते कधीच तुटत नाही.

|| प्रेमाचा धागा... आयुष्यभराचा सहवास ||

### रक्षाबंधनाच्या शुभेच्छा संदेश

- या राखीला आपले नाते अधिक दृढ होवो.
- भावाच्या आयुष्यात सुख, यश आणि समृद्धी नांदो.
- बहिणीच्या आयुष्यात आनंद, आरोग्य आणि यश सदैव नांदो.
- रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!



**नाती जपा... संस्कार जपा... रक्षाबंधन साजरे करा अभिमानाने!**

# राखीच्या धाग्यात गुंफलेलं नातं: प्रेम, विश्वास आणि जिव्हाळ्याचा उत्सव!

**रक्षाबंधन : काळ बदलला, नाती बदलली; पण भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा धागा आजही तितकाच घट्ट**

रक्षाबंधन म्हणजे केवळ बहिणीने भावाच्या मनगटावर राखी बांधण्याचा दिवस नव्हे; तर प्रेम, विश्वास, माया, आपुलकी आणि आयुष्यभर एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्याच्या भावनेचा उत्सव आहे. श्रावण पौर्णिमेच्या या मंगलदिनी भाऊ-बहिणीच्या नात्याला नव्याने उजाळा मिळतो. राखीचा छोटासा धागा दिसायला नाजूक असला, तरी त्यामागील भावना मात्र अतूट असतात.

बालपणीच्या आठवणींमध्ये भाऊ-बहिणीचे नाते अनेक रंगांनी भरलेले असते. कधी छोट्या-छोट्या कारणांवरून भांडण, कधी एकमेकांची तक्रार, तर कधी आईच्या नजरेआड एकमेकांना साथ देणेः पण मोठे झाल्यावर लक्षात येते की, बालपणीची ती भांडणेही प्रेमाचीच एक भाषा होती. काळाच्या ओघात प्रत्येकजण आपापल्या संसारात, कामात आणि जबाबदाऱ्यांमध्ये व्यस्त होतो. अंतर वाढते; भेटी कमी होतात. मात्र मनातील नात्याची ऊब कधीच कमी होत नाही.

रक्षाबंधनाच्या दिवशी बहिण भावाच्या मनगटावर राखी बांधते आणि त्याच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करते. भाऊही बहिणीला प्रेम, सन्मान आणि तिच्या प्रत्येक सुख-दुःखात साथ देण्याचे आश्वासन देतो. आजच्या बदलत्या काळात या आश्वासनाचा अर्थ आणखी व्यापक झाला आहे. बहिणीचे रक्षण करणे म्हणजे केवळ संकटाच्या वेळी तिच्यासमोर उभे राहणे नव्हे; तर तिच्या स्वप्नांना बळ देणे, तिच्या निर्णयांचा सन्मान करणे आणि तिला आयुष्यात समान संधी मिळण्यासाठी तिच्या सोबत उभे राहणे होय. आजच्या आधुनिक युगात बहिणी शिक्षण, व्यवसाय, प्रशासन, विज्ञान, कला, क्रीडा अशा प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहेत. त्यामुळे रक्षाबंधनाच्या नात्याची व्याख्याही बदलत आहे. आता फक्त भाऊ बहिणीचे रक्षण करतो असे नाही, तर अनेकदा बहिणही भावाची ताकद बनून त्याच्या आयुष्यातील कठीण प्रसंगांना सामोरे जाण्याचे धैर्य देते. म्हणूनच हे नाते 'रक्षणाचे' नसून परस्पर विश्वासाचे आणि परस्पर आधाराचे आहे.



राखीचा धागा बांधताना बहिणीच्या डोळ्यांत असते प्रेमाची चमक आणि भावाच्या मनात असतो बहिणीच्या सुखाचा संकल्प. या एका धाग्यात बालपणाच्या आठवणी, आई-वडिलांची माया, घरातील संस्कार आणि भविष्यातील असंख्य स्वप्ने गुंफलेली असतात.

रक्षाबंधन हा सण आपल्याला आणखी एक महत्त्वाचा संदेश देतोङ्गनाती जपण्यासाठी मोठ्या गोष्टींची गरज नसते. एखादा फोन, दोन प्रेमाचे शब्द, अडचणीच्या वेळी दिलेली साथ किंवा 'मी आहे ना' एवढेच शब्द नात्याला पुन्हा जिवंत करतात. पैसा, संपत्ती आणि भौतिक सुखसोयी आयुष्यात महत्त्वाच्या असल्या तरी माणसाला खऱ्या अर्थाने श्रीमंत करणारी गोष्ट म्हणजे आपली माणसं.

आज अनेक भाऊ-बहिणी शिक्षण, नोकरी किंवा व्यवसायामुळे वेगवेगळ्या शहरांत, राज्यांत किंवा देशांत राहतात. प्रत्यक्ष भेटणे शक्य नसले तरी राखीचा धागा मनाने त्यांना जोडतो. पोस्टाने पाठवलेली राखी असो, ऑनलाइन पाठवलेली भेट असो किंवा व्हिडिओ कॉलवरून व्यक्त केलेल्या शुभेच्छा असोतङ्गभावना खरी असेल तर अंतर कधीच नात्याच्या आड येत नाही.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

गणेशोत्सवाच्या वर्गणीवरून मित्रांमधील वाद टोकाला

# सुरगाण्याच्या तरुणाला सापुताऱ्यात संपवलं

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**मुंबई** – गुजरातमधील डांग जिल्ह्यातील प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण असलेल्या सापुतारा येथे मित्रांमधील किरकोळ वादाचे रूपांतर रक्तरंजित हल्ल्यात झाले. गणेशोत्सवाच्या वर्गणीवरून तसेच मागील वर्षी झालेल्या जुन्या वादातून सुरू झालेल्या बाचाबाचीचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी एका मित्राने धारदार शस्त्राने दुसऱ्या मित्राच्या पोटावर वार केला. गंभीर जखमी झालेल्या सुरगाण्याच्या २७ वर्षीय युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेने सुरगाणा आणि सापुतारा परिसरात खळबळ उडाली आहे. हेमंत ऊर्फ विकी सूर्यवंशी (२७) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी कुणाल किरण परदेशी याला सापुतारा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तर अन्य चार संशयितांचीही पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सापुतारा येथे मित्रांचा समूह एकत्र आला असताना त्यांच्यात गणेशोत्सवाच्या वर्गणीवरून वाद सुरू झाला. या वादाला मागील वर्षी झालेल्या जुन्या भांडणाची पार्श्वभूमी असल्याचे सांगण्यात येत आहे.

# पेठ तालुक्यातील ११ पर्यटक काठमांडूत अडकले

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – नेपाळमध्ये भीषण महापुराने सर्वत्र हाहाकार माजवला आहे. नेपाळमध्ये भारतातील अनेक नागरिक अडकल्याची माहिती समोर आली आहे.

त्यातील २८८ भारतीय नागरिक बेपत्ता असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. बचाव पथकांकडून बेपत्ता नागरिकांची शोधाशोध सुरू

## सुरक्षित परतीसाठी आवश्यक कार्यवाही सुरु



आहे. दरम्यान, नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुक्यातील ११ पर्यटक काठमांडू येथे अडकले असल्याची माहिती समोर आली आहे. ११ पर्यटक काठमांडूत अडकले पेठ तालुक्यातील ११ पर्यटक काठमांडू येथे अडकले असून हे सर्व पर्यटक पेठ नगरपंचायत हद्दीतील आहे. सध्या ते सुरक्षित असल्याची प्राथमिक माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली आहे. पर्यटनासाठी नेपाळमध्ये गेलेल्या या ११ जणांचा नेपाळमधील भारतीय दूतावासाशी संपर्क झाला असून, त्यांना आवश्यक ती मदत पुरवली जात आहे.

अडकलेल्या पर्यटकांची माहिती प्रशासनाकडून संकलित करण्यात आली असून, त्यांच्या सुरक्षित परतीसाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही केली जात आहे.

बेनोडाच्या शहीद स्मृती विद्यालयात

# शिक्षक पालक सहविचार सभा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहीद स्मृती विद्यालय बेनोडा (श.) शिक्षक पालक सहविचार सभा बेनोडाच्या शहीद स्मृती शिक्षण समिती अध्यक्ष विनय फरकाडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.रमाकांत फरकाडे, सदस्य दीपक फरकाडे व पालक उपस्थित होते. सभेत विद्यार्थी व पालकांना येणाऱ्या समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक एस.एस.चवरे यांनी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना भेटणाऱ्या विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती व इतर योजनांबाबत चर्चा करण्यात आली.

पालकसभेचे संचालन ए.के.राजगुरे व आभार व्ही.एम.नवले यांनी मानले.





# राज्य महोत्सव गणेशोत्सवाच्या स्पर्धेत अधिकाधिक गणेश मंडळांनी सहभाग घ्यावा

## विभागीय आयुक्त नयना गुंडे यांचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – महाराष्ट्र शासनाने राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, या अंतर्गत 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा' आता तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने १७ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार या भव्य स्पर्धेची घोषणा करण्यात आली आहे. अमरावती विभागातील जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

या स्पर्धेची माहिती पुढील प्रमाणे आहे या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक आणि पात्र मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या ganeshostav.pldm-ka.co.in या पोर्टलद्वारे विहित वेळेत दि.७ सप्टेंबर २०२६ पर्यंत आपला अर्ज ऑनलाईन सादर करावयाचा आहे. स्पर्धेसाठी पात्रता व अटी पुढील प्रमाणे आहेत या स्पर्धेत केवळ संबंधित यंत्रणेद्वारे नोंदणीकृत संस्था अथवा परवानाधारक गणेशोत्सव मंडळेच सहभागी होऊ शकतात. नवीन मंडळांना संधी देण्याच्या उद्देशाने, चालू आर्थिक वर्षाच्या मागील सलग




दोन वर्षे राज्यस्तरीय किंवा जिल्हास्तरीय पारितोषिके प्राप्त झालेली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे यावर्षीच्या पारितोषिकास पात्र ठरणार नाहीत. (सदरची अट राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गणेशोत्सव मंडळांनाही लागू राहील). या स्पर्धेसाठी मंडळांनी केलेल्या कामाचा कालावधी मागील वर्षाच्या अनंत चतुर्दशीपासून चालू वर्षाच्या अनंत चतुर्दशीपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

विविध स्तरांवरील विजेत्या मंडळांना खालीलप्रमाणे भरघोस रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. तालुका स्तर: प्रथम क्रमांक – २५ हजार रुपये, जिल्हा स्तर: प्रथम क्रमांक –५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक – ४० हजार रुपये, तृतीय क्रमांक – ३० हजार रुपये, राज्य स्तर: प्रथम क्रमांक – ७ लाख ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक – ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक– २ लाख ५० हजार रुपये राष्ट्रीय स्तर: प्रथम क्रमांक – ७ लाख ५० हजार रुपये द्वितीय क्रमांक– ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक–२ लाख ५० हजार रुपये आंतरराष्ट्रीय स्तर: प्रथम क्रमांक– ७ लाख ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांक– ५ लाख रुपये, तृतीय क्रमांक– २ लाख ५० हजार रुपये याव्यतिरिक्त, राज्यस्तरीय निवड समितीकडे आलेल्या ३६ जिल्हास्तरीय प्रथम विजेत्या मंडळांपैकी, राज्यस्तरावरील पहिले ३ विजेते वगळून उर्वरित ३३ मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी ५० हजार रुपये चे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.

उत्कृष्ट मंडळांची निवड करताना कलांचे जतन व संवर्धन, संस्कृतीचे जतन, निसर्गाचे व सार्वजनिक संपत्तीचे संवर्धन, सामाजिक कार्य आणि गणेशोत्सव आयोजनातील विधायकता (उदा. पर्यावरणपूरक मूर्ती, सजावट, महिलांचा ३० टक्के सहभाग इत्यादी) या १०० गुणांच्या निकषांवर परीक्षण केले जाईल.

स्पर्धेचे सविस्तर निकष, आवश्यक कागदपत्रे आणि अर्जाच्या प्रक्रियेबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी १७ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयाचे सविस्तर अवलोकन करावे तसेच पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या अधिकृत संकेतस्थळाला सरपशीर्हेीरीं.श्रिवाझर.ले.ळप आवर्जून भेट द्यावी. अधिक माहितीसाठी शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या ु.ारहरीरिह–ीर.सीं.ळप या अधिकृत संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. तरी समाजाभिमुख आणि पर्यावरणपूरक उत्सव साजरा करणाऱ्या अमरावती विभागातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे आणि मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त, नयना गुंडे, यांनी केले आहे.

# 'मराठी'साठी एक वर्षाची मुदतवाढ; फडणवीसांची घोषणा : रिक्षा-टॅक्सीचालकांना दिलासा, मुख्यमंत्र्यांची शिवसेना शिंदे गटावर कुरघोडी?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील अमराठी ऑटो रिक्षा–टॅक्सीचालकांना व्यावहारिक मराठी शिकण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केली.

पुढील वर्षाच्या सुरुवातीला उत्तर प्रदेश विधानसभेच्या होऊ घातलेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी उत्तर भारतीयांचा रोष टाळण्यासाठी हा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. याशिवाय या निर्णयाच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांनी शिवसेना शिंदे गटावर कुरघोडी केल्याचे मानले जाते. महाराष्ट्रात रिक्षा आणि टॅक्सी चालविणाऱ्या अमराठी चालकांना प्रवाशांशी मराठीतून संवाद साधता येणे आवश्यक असल्याचे मानून परिवहन विभागाने कायद्यात सुधारणा केली. याशिवाय १०५ दिवसांचा विशेष मराठी भाषा प्रशिक्षण उपक्रम राबवला.

जुजबी मराठी न बोलणाऱ्या अमराठी रिक्षा–टॅक्सी चालकांवर कायद्यात कारवाईची तरतूद आहे. परिवहन विभागाकडून तशी कारवाई सुरु झाल्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी अमराठी चालकांची मागणी लक्षात घेऊन त्यांना मराठी भाषा शिकण्यासाठी तीन महिन्यांची मुदत वाढवून दिली होती. या पार्श्वभूमीवर भाजप नेते हाजी अराफत शेख यांच्या नेतृत्वाखालील ऑटोरिक्षा–टॅक्सी चालकांच्या शिष्टमंडळाने आज सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीनंतर फडणवीस यांनी अमराठी ऑटो रिक्षा–टॅक्सी चालकांना व्यावहारिक मराठी शिकण्यासाठीच्या निर्णयाला एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येत असल्याचे जाहीर केले. एमपीएससी पेपरफुटीचे राजकारण अयोग्य महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पेपरफुटी प्रकरणी कोणीही कोणत्याही पक्षाचा असो, त्याच्यावर कारवाई होणारच. एमपीएससी परीक्षा पारदर्शी पद्धतीनेच पार पडली पाहिजे, हेच सरकारचे मत आहे.

# देशाच्या विकासात उपग्रहांची भूमिका

## एचकेएम उर्दू हायस्कूलमध्ये भुमाहिती शास्त्रज्ञ डॉ.प्रीतम वंजारी यांचे प्रतिपादन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – स्थानिक एच.के.एम.उर्दू हायस्कुलमध्ये 'देशाच्या विकासात उपग्रहांची भूमिका' या विषयावर माहितीपुर्ण सेमिनारचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मृद व जलसंधारण विभाग, पुणे येथील पाणलोट विकास यंत्रणेचे भुमाहिती शास्त्रज्ञ तथा सहमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.प्रीतम वंजारी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन विद्यार्थ्यांना संबोधित केले.

डॉ.वंजारी यांनी उपग्रह तंत्रज्ञानामुळे कृषी, शिक्षण, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान, हवामान अंदाज, नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन तसेच देशाच्या सीमांवर लक्ष ठेवण्यासारखी अनेक जटिल कामे कमी खर्चात आणि कमी वेळेत शक्य झाली असल्याचे सांगितले. भविष्यात या क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी असुन विद्यार्थ्यांनी विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्राकडे आवर्जून वळावे, असे आवाहन त्यांनी केले. देशात शास्त्रज्ञांची संख्या अद्यापही गरजेपेक्षा कमी असून नव्या पिढीने संशोधन क्षेत्रात पुढे यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मिल्लत सोशल वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष अब्दुल शकील होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी डॉ.वंजारी यांच्या कार्याचा गौरव करत, आपल्या मातीतून घडलेली व्यक्ती स्वबळावर मेहनतीच्या जोरावर उच्च पदापर्यंत पोहोचल्याचा अभिमान व्यक्त केला. यावेळी शाल व पुष्पगुच्छ देऊन डॉ.वंजारी यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नईम शेख जरुडकर यांनी उपग्रहांबाबतची प्राथमिक माहिती देत प्रास्ताविक केले. संचालन व आभार प्रदर्शन नईम अहमद यांनी केले. या सेमिनारला शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्थेची

# ३८ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – स्थानिक उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्थेची ३८ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्क्रांती शिक्षण संस्थेच्या सभागृहात संस्थाध्यक्ष रामराव वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली.

यावेळी सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला, सभासदांना प्रशिक्षण देण्याकरिता सहकार सभागृह आणि १० वी , १२ वी नंतरच्या विद्यार्थ्यांकरीता मार्गदर्शन केंद्र सुरु करण्याचा मानस अध्यक्ष रामराव वानखडे यांनी यावेळी व्यक्त केला. अमरावती जिल्हा सहकार बोर्डाचे जी.आर.गवई यांनी सभासदांना प्रशिक्षण, आर्थिक साक्षरतेवर मार्गदर्शन केले,

माजी अध्यक्ष देवीसिंग खुटपळे, उत्क्रांती ॲग्रो प्रोड्युसर कंपनीचे अध्यक्ष रामकृष्ण मेश्राम, उत्क्रांती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र पाटील, उपाध्यक्ष डॉ.अशोक खोपे, संचालक साहेबराव माकोडे, सुरेश कानडे, रमेशराव देशमुख, गजानन बिजवे, वामनराव सव्वालाखे, उद्योजक राजेंद्र कुऱ्हाडे, संचालक सुनिल हरले, डॉ.सुशिल पाटील, डॉ.नितीन वानखडे, किरण शेरेकर, प्रशांत मानेकर, देवल धोटे, जयश्री फुसे, ॲड.प्रभाकर सावरकर, प्रदीप क्षिरसागर, पुंडलिकराव हरले, बाबाराव देशमुख उपस्थित होते. व्यवस्थापक राजीव शेलकर यांनी अहवाल वाचन केले. व्यवस्थापक ज्ञानेश्वर घोडकी यांनी नफा नियोजनाचे वाचन राजेंद्र वाडबुदे यांनी केले. याप्रसंगी सर्व शाखांचे सहयोगी संचालक मंचावर उपस्थित होते,




येशुदास फ्रेम गायक पंकज लेकुरवाळे यांच्या गणेश वंदनेने सभेची सुरुवात करण्यात आली. संचालन गजानन बिजवे यांनी तर आभार रविंद्र वसुले यांनी मानले. समारोपीय भाषण उपाध्यक्ष डॉ.अशोक खोपे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वितेकरीता लोणी शाखा व्यवस्थापक प्रमोद वाडोदे, बेनोडा शाखा व्यवस्थापक अंकुश वानखडे, शैलेश खोपे, हर्षल डखरे, श्रीकांत गावंडे, विठ्ठल वाडेकर, श्रीकांत कानडे, ओम नेरकर, योगेश तडस, अमोल कडू, निलेश नेरकर, गीतेश कडे, सुनिल राऊत, मनोज राऊत आदींनी सहकार्य केले.

# एचडीएफसी बँकेविरोधात अमेरिकेत खटला : बँकेच्या समभागात दोन टक्के घसरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – महाराष्ट्र सरकारच्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) बेकायदेशीरपणे जास्त व्याज देण्यासाठी तो विपणन खर्च म्हणून दाखवून छुपा गैरव्यवहार केल्याच्या आरोपाखाली, भारतातील प्रमुख खासगी बँक असलेल्या




एचडीएफसी बँकेविरुद्ध न्यू यॉर्कमध्ये फेडरल सिक्युरिटीज खटला दाखल करण्यात आला आहे.

गुंतवणूकदार ज्वलंत नटवरलाल सोनेजी यांनी न्यू यॉर्कच्या 'यू.एस. डिस्ट्रिक्ट कोर्ट फॉर द सदर्न डिस्ट्रिक्ट'मध्ये दाखल केलेल्या या तक्रारीत मुंबईत मुख्यालय असलेल्या या बँकेसह मुख्य कार्यकारी अधिकारी शशीधर जगदीशन आणि मुख्य वित्त अधिकारी श्रीनिवासन वैद्यनाथन यांना लक्ष्य करण्यात आले आहे. हा खटला १७ जुलै २०२३ ते २६ मे २०२६ या कालावधीत एचडीएफसीचे अमेरिकन डिपॉझिटरी शेअर्स खरेदी करणाऱ्या सर्व गुंतवणूकदारांच्या वतीने दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मोठ्या ठेवी आकर्षित करण्यासाठी एचडीएफसी बँकेने त्यांना ६.०१ टक्के व्याजाचे आश्वासन दिले होते. हे व्याज नेहमीच्या ग्राहकांना दिलेल्या ३.५ टक्के बचत दरापेक्षा २.५१ टक्के जास्त होते, जे आरबीआय नियमांचे उल्लंघन आहे.

बँकिंग नियम वैयक्तिक ठेवीदारांना वाटाघाटी करून वेगळे परतावे देण्यास स्पष्टपणे मनाई करतात. त्यामुळे वरिष्ठ व्यवस्थापनाने यावर एक मार्ग काढल्याचा आरोप आहे.

# तुळजाभवानी मंदिराच्या सुरक्षा व्यवस्थेत वाढ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**धाराशिव** – आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिराच्या सुरक्षेत मोठी वाढ करण्यात आली असून, मंदिराच्या सुरक्षेसाठी 'महाराष्ट्र सुरक्षा दला'च्या ११६ जवानांची तुकडी तैनात करण्यात आली आहे. मंदिर संस्थानने दिलेल्या माहितीनुसार ही सुरक्षा व्यवस्था लागू करण्यात आली आहे.



आगामी सण-उत्सवाच्या काळात होणारी मोठी गर्दी लक्षात घेता मंदिर परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी राज्य शासनाच्या अखत्यारीत येणाऱ्या एमएसएफ दलाची मदत घेण्यात आली आहे. या सुरक्षा तुकडीत १ निरीक्षक आणि ४ पोलीस उपनिरीक्षकांसह एकूण ६ वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी आणि नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी या तुकडीने मंगळवारी तुळजापूर शहरातून रुट मार्च काढला.

# वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा

**राही इंग्लिश कॉन्व्हेन्टमध्ये वृक्षारोपण व खाऊ वाटप**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – सद्य:च्या काळात वाढदिवस फुगे, केक आणि अनावश्यक खर्चात साजरे करण्याऐवजी सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा स्तुत्य उपक्रम सुरळी येथील राही इंग्लिश कॉन्व्हेन्टमध्ये पाहायला मिळाला. हृदयांश सूरज राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करुन विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.





या प्रसंगी हृदयांशच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करुन वाढदिवस आनंदात साजरा करण्यात आला. पर्यावरणपूरक पद्धतीने वाढदिवस साजरा करण्याच्या राऊत परिवाराच्या या उपक्रमाचे शिक्षक, पालक आणि उपस्थितांनी मनापासून कौतुक केले.

कार्यक्रमाला शाळेच्या संचालिका लता खोरगडे, पालक सूरज राऊत, शुभांगी राऊत तसेच शाळेचे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, आजच्या बदलत्या वातावरणात वृक्षारोपण करणे आणि लावलेल्या झाडांचे संगोपन करणे ही प्रत्येकाची सामुहिक जबाबदारी आहे. प्रत्येक पालकाने आपल्या मुलांच्या वाढदिवसानिमित्त किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प केल्यास पर्यावरण संरक्षणाला मोठी चालना मिळेल.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या वतीने हृदयांश राऊत यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

**नारळी पौर्णिमेनिमित्त**

# स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुलात माता-पिता पूजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – कलाजिवन बहुउद्देशीय संस्थेद्वारा संचालित स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुल, ढगा येथे नारळी पौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांसाठी माता-पिता पुजन कार्यक्रम उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण व पुजन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. आई-वडिलांचा त्याग, प्रेम, संस्कार आणि मार्गदर्शन यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावुन सांगत भारतीय संस्कृतीतील माता-पित्यांचे स्थान अधोरेखित करण्यात आले. गुरुकुलाच्या 'संस्कार, शिक्षण आणि सेवा हाच आमचा ध्यास' या विचारधारेनुसार विद्यार्थ्यांमध्ये कृतज्ञता, आदर, संस्कार आणि सामाजिक मूल्यांची जपणुक व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुचिता बंड होत्या. प्रमुख पाहुणे संस्थेचे अध्यक्ष युवराज ठाकरे, मुख्याध्यापक नितीन ठाकरे तसेच गुरुकुलचे संस्थापक रंजित इंगोले उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन हर्षा वंजारी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कविता वंजारी, ऋतुजा घोरमाडे, रुपाली बघेल, उदय घोरमाडे, ज्योती सेंडे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. पालकांचे संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले.

# दारूसाठी आईकडे पैसे मागितले, घरातील सामान फेकले : संतापलेल्या लहान भावाने थेट मोठ्या भावाचा काटा काढला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपूर** – दारूच्या व्यसनामुळे कुटुंबात वारंवार होणाऱ्या वादाचा भयंकर शेवट झाला. नागपुरातील कळमना पो-लीस ठाण्याच्या हद्दीत दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने मोठ्या भावाने घरात गोंधळ घातल्याचा आरोप आहे. यानंतर संतापलेल्या लहान भावाने मोठ्या भावावर चाकूने वार केले. गंभीर जखमी झालेल्या २१




वर्षीय तरुणाचा मेयो रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. मृत तरुणाचे नाव मोहन चिंताराम बांते (२१) असे आहे. तर आरोपी लहान भाऊ समीर चिंताराम बांते (१९) याला कळमना पोलिसांनी अटक केली आहे. हल्ल्यात वापरण्यात आलेला चाकूही पोलिसांनी जप्त केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहनला दारूचे व्यसन होते. दारू पिण्यासाठी तो अनेकदा आई-वडिलांकडे पैसे मागत असे. मात्र पैसे न मिळाल्यास तो घरात वाद घालत तसेच कुटुंबीयांना शिवीगाळ करत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. या प्रकारामुळे घरातील वातावरण वारंवार तणावपूर्ण होत असल्याची माहिती आहे. आईने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर संतापला गुरुवारी सायंकाळी सुमारे सहा वाजता मोहनची आई कामावरून घरी परतली. त्यावेळी मोहन दारूच्या नशेत असल्याचे सांगण्यात आले. त्याने आईकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले. मात्र आईने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर मोहन संतापला. त्याने घरातील सामान बाहेर फेकण्यास सुरुवात केली. त्यामुळे घरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. यानंतर मोहनचा १९ वर्षीय भाऊ समीर याच्यासोबतही वाद झाला. मोहनने समीरला शिवीगाळ करत त्याच्याशी मारहाण करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर चाकूने हल्ला करण्याची धमकीही दिल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. लहान भावाने मोठ्या भावावर केले वार या प्रकारानंतर काही वेळाने परिस्थिती आणखी चिघळली.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६४८/२०२६** **ने.ता.११/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती शोभा रामदासजी शियाले, वय अं.५५ वर्ष, धंदा-गृहिणी

२) किरण रामदास शियाले, वय अं.३३ वर्ष, धंदा-शेती

क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

३) सौ.नुतन नितीन घोरपडे, वय अं.३५ वर्ष, धंदा- गृहिणी

रा.नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रामदास लक्ष्मणराव शियाले, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१०/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७४२/२०२६** **ने.ता.०६/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) जिजाबाई राजेंद्र रामटेके, वय अं.५३ वर्ष, धंदा-गृहिणी

२) शुभम राजेंद्र रामटेके, वय अं.२६ वर्ष, धंदा-खाजगी नोकरी

दोन्ही रा.वार्ड क्र.९, हनुमान, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती,

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत राजेंद्र गुलाबराव रामटेके, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०६/१७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# प्रताप सरनाईकांचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी फिरवला

**शिवसेना-भाजपमध्ये वाद?**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचा रिक्षा-टॅक्सीचालकांच्या मराठीबाबतचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फिरवला.



देवेंद्र फडणवीसांनी मराठी शिकण्यासाठी रिक्षा टॅक्सीचालकांना एक वर्षांची मुदतवाढ दिली. रिक्षा टॅक्सीचालकांच्या शिष्टमंडळाने काल देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली. मराठी शिकण्यासाठी प्रयत्न करतोय, पण त्यासाठी वेळ मिळावा अशी मागणी त्यांनी केली. ती मागणी मान्य करून देवेंद्र फडणवीसांनी एक वर्षांची मुदतवाढ दिली. तोवर त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली जाणार नाही असं देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केलं. १५ ऑगस्ट नंतर परिवहनमंत्र्यांनी मराठी शिकण्यासाठी एक महिन्यांची मुदतवाढ दिली होती. मात्र देवेंद्र फडणवीसांनी आता एक वर्षांची मुदतवाढ दिली. दरम्यान या निर्णयाला उत्तरप्रदेशमधल्या आगामी निवडणुकींची किनार आहे का? असा सवाल या निमित्तानं उपस्थित होतो. तसेच प्रताप सरनाईकांचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी फिरवल्याने शिवसेना आणि भाजपमध्ये वाद होण्याची देखील शक्यता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयावर मंत्री नाराज असल्याची चर्चा देखील रंगली आहे. उत्तर भारतीयांना दिलासा मात्र मराठी भाषेला दुजाभाव का..?, असा सवाल उपस्थित होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांना विश्वासात न घेता एकतर्फी निर्णय घेतला. त्यामुळे शिवसेनेचे मंत्री नाराज असल्याची सूत्रांची माहीती आहे.

मुख्यमंत्री एकतर्फी निर्णय घेणार असतील तर मग कॅबिनेट बैठक कशासाठी घेतात..?, असा नाराज मंत्र्यांचा सूर आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑटो रिक्षा आणि टॅक्सी चालकांना जूजबी मराठी शिकण्यासाठी एक वर्षाची दिलेली मुदतवाढ वादात सापडण्याची शक्यता आहे. देवेंद्र फडणवीसांनी अधिसूचना काढून मंत्री मंडळाचे सर्व अधिकार स्वत:कडे घेतल्यामुळे ही महायुतीमधील मंत्री नाराज असल्याची वरिष्ठ सूत्रांची माहिती आहे.




# 'औषध निरीक्षक'नंतर आता एमपीएससी एक्साईज पेपरचा 'मार्किंग पॅटर्न' फुटला, रोहित पवारांचा मोठा आरोप : 'सहसचिवा'ची भूमिका संशयास्पद?



*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या औषध निरीक्षकपदाचा पेपर फुटल्यानंतर आता तशीच आणखी एक घटना समोर आली आहे. गेल्या वर्षी एमपीएससीकडून एक्साईज डिपार्टमेंट म्हणजे राज्य उत्पादन शुल्क उपनिरीक्षक (गट–क) पदासाठी घेण्यात आलेल्या पेपरचा 'मार्किंग पॅटर्न' फुटल्याचा आरोप रोहित पवारांनी केला आहे. त्यामुळे ठराविक उमेदवारांना फायदा झाला असून त्यामध्ये लाखो रुपयांची देवाण–घेवाण झाल्याचा आरोप आता करण्यात येत आहे.

या प्रकरणी काही उमेदवारांनी नागपूर खंडपीठात धाव घेतली असून राज्य उत्पादन शुल्कचा पेपर फुटल्याचाही आरोप केला आहे. या संबंधी नवी मुंबई पोलिसांनी लोकसेवा आयोगाला सादर केलेला अहवाल न्यायालयात सादर करावा असे निर्देश आधी देण्यात आले होते. मात्र गुरुवारी (२७ ऑगस्ट) झालेल्या सुनावणीमध्येही आयोगाने नवी मुंबई पोलिसांनी दिलेला गोपनीय अहवाल सादर केला नाही. त्यामुळे येत्या २९ ऑगस्ट रोजी या प्रकरणावर अंतिम सुनावणी होणार असल्याची माहिती आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने २३ सप्टेंबर २०२५ रोजी उपनिरीक्षक (गट–क) पदासाठी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा घेतली होती. त्या परीक्षेचा मार्किंग पॅटर्न फुटल्याचा आरोप होत आहे. सोबतच याचा पेपरही फुटल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकरणी काही उमेदवारांनी न्यायालयात धाव घेतली आहे. लोकसेवा आयोगाच्या अधिकाऱ्यांनी घाईघाईत अंतिम निकाल लावल्याची तक्रारही उमेदवारांनी केली आहे.

# अवघ्या २१ वर्षीय मॉडेलला घरात घुसून संपवणाऱ्या जिम ट्रेनरच्या एन्काउंटरनंतर मुसक्या आवळल्या : पोलिसांच्या स्पेशल स्टाफ टीमसोबत चकमक



*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***नवी दिल्ली*** – दिल्लीस्थित मॉडेल मुस्कानच्या हत्येचा आरोपी, जिम ट्रेनर अकीब उर्फ इम्रानचा दिल्ली पोलिसांकडून एनकाऊंटर करण्यात आला.

इम्रानने दिल्ली विद्यापीठाची विद्यार्थिनी असलेल्या मुस्कानच्या घरात प्रवेश करून तिची हत्या केली होती. दिल्ली पोलिसांच्या म्हणण्यानुसार, इम्रानच्या अटकेदरम्यान वेस्टर्न डिस्ट्रिक्ट स्पेशल स्टाफ टीमसोबत त्याची चकमक झाली. टीमला पाहताच इम्रानने गोळीबार केला. पोलिसांनी प्रत्युत्तर म्हणून केलेल्या गोळीबारात त्याच्या पायाला गोळी लागली. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. २६ वर्षीय इम्रान पूर्वी जिम ट्रेनर म्हणून काम करत होता. बुधवारी संध्याकाळी मुस्कान घरी एकटी होती. इम्रान घरी आला तेव्हा तिचे कुटुंबीय बाहेर गेले होते.

त्या दोघांमध्ये कोणत्यातरी गोष्टीवरून वाद झाला. त्यानंतर आरोपीने मुस्कानवर अनेकवेळा चाकूने वार करून फरार झाला.

# जलद क्षयरोग निदानासाठी महाराष्ट्र 'नाट'चा विस्तार करणार

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – महाराष्ट्राचा आरोग्य विभाग क्षयरोगाच्या (टीबी) जलद आणि अधिक अचूक निदानासाठी 'न्यूक्लिक ॲसिड ॲम्प्लीफिकेशन टेस्ट'चा वापर वाढवण्याच्या तयारीत आहे. विशेषतः ग्रामीण भागांवर लक्ष केंद्रित केले जात आहे, जिथे अजूनही पारंपरिक सूक्ष्मदर्शक चाचण्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, डिसेंबर २०२४ ते ४ ऑगस्ट २०२६ दरम्यान 'टीबीमुक्त भारत अभियाना' अंतर्गत महाराष्ट्रात ३९.२१ लाख टीबी चाचण्या घेतल्या. यापैकी २१.४८ लाख म्हणजेच ५५% चाचण्या 'नाट'द्वारे करण्यात आल्या. 'नाट' हे एक आण्विक निदान तंत्रज्ञान आहे. जे टीबीचे जिवाणू शोधते आणि विशिष्ट चाचण्यांमध्ये औषधांना असणारा प्रतिकार देखील ओळखू शकते.

# वारंवार वादात सापडणाऱ्या मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी घेतली देवेंद्र फडणवीसांची भेट



*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**ठाणे** – मुंबईच्या महापौरपदावर विराजमान झाल्यापासून वाद आणि आरोपांचे शुक्लकाष्ठ मागे लागलेल्या रितू तावडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या या भेटीत रितू तावडे यांनी उझठज बदलण्याची मागणी केल्याची माहिती आहे. दरम्यान, वारंवार वादात सापडणाऱ्या मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी घेतलेली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट अनके कारणांनी महत्वाची ठरली आहे. कारण रितू तावडे आणि शिक्षण समितीच्या अध्यक्ष राजेश्री शिरवडकर यांच्यातील अंतर्गत धुसफूस नुकतीच चव्हाट्यावर आली होती. यासंदर्भात बोलताना रितू तावडे यांनी अप्रत्यक्षपणे राजेश्री शिरवडकर यांचा उल्लेख 'झारीतले शुक्राचार्य' असा केला होता. रितू तावडे यांचे हेच वक्तव्य त्यांना भोवणार की काय, अशी चर्चा भाजपच्या अंतर्गत वतुर्ळात रंगली देखील होती. अशातच आता रितू तावडे यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन अनेक विषयांवरही चर्चा केल्याची माहिती आहे. २५ लाख रुपयांच्या सोशल मीडिया टेंडरवरून वाद, झठज मध्ये बदल करण्याची मागणी महापौर रितू तावडे यांनी नुकताच निर्माण झालेलला सोशल मीडियाच्या प्रस्तावाच्या वादाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी पालिकेच्या जनसंपर्क अधिकाऱ्यामध्ये बदल करण्याची मागणी त्यांनी या बैठकीत प्रमुखतेने मांडली. बुधवारी रात्री ही भेट घेतल्याची माहिती आहे. महापौर कार्यालयाभोवतीच्या वादाच्या पार्श्वभूमीवर झालेली ही भेट महत्वपूर्ण असून आता या भेटीचीही राजकीय वतुर्ळात चर्चा रंगली आहे.

# तुकाराम मुंढे यांच्या एफडीएचा आता रुग्णालयाकडे मोर्चा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नागपूर** – नागपूरच्या इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय म्हणजेच मेयो रुग्णालय परिसरातील बालाजी कॅन्टीनमध्ये अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. स्वच्छतेचा अभाव, नियमांचा पालन न करणे, आणि काही आवश्यक परवाने नसल्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत अन्न तयार करण्याचे स्वयंपाक घर आणि अन्न वाढण्याच्या जागेवर अस्वच्छता आढळली आहे. तर कॅन्टीनमधील कचरा व्यवस्थापनाची व्यवस्था देखील योग्य नसल्याचे

## नागपुरात डॉक्टरांच्या कॅन्टीनलाच दणका

## मेडिकलच्या ३ उपहारगृहाकडे परवाना नसल्याचं समोर



आढळून आले आहे. एकीकडे नागपुरातील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय रुग्णालयात विनापरवाना सुरू असलेल्या उपहारगृहाच्या घटनेनंतर आता 'शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय' म्हणजेच 'मेडिकल कॉलेज' परिसरामधील उपहारगृहांची ही तपासणी अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे मेडिक्ल कॉलेज परिसरात सुरू असलेल्या चार उपहारगृहांपैकी तीन उपहारगृहाकडे अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना नसल्याचे समोर आले आहे.

चार पैकी तीन उपहारगृहाकडे अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना नसल्याचे समोर दरम्यान, परवाना नसलेल्या तीन उपहार गृहांपैकी एका उपहारगृहाला त्यांच्याकडे अन्नाविषयक परवाना नसल्याने तातडीने बंद करण्याची सूचना देण्यात आली आहे. तर इतर दोन छोट्या उपहारगृहांना परवाना घेण्यासाठी आवश्यक अर्ज प्रक्रिया करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. विशेष म्हणजे नागपूरच्या मेडिकल कॉलेज परिसरात रोज रुग्ण, त्यांचे नातेवाईक, कर्मचारी आणि इतर लोक असे एकूण १५,००० नागरिकांची वदर्ळ असते.

